परळी संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 138 | शुक्रवार दि. 12 जुन 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060




# "कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असेल तर विचार केला जाईल"
# सुनेत्रा पवारांचा मोठा इशारा



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा आज (11 जून) मुंबईत वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत पक्षाच्या पुढील वाटचालीबाबत भाष्य केलं. मात्र, भाषणाला सुरुवात करताच सुनेत्रा पवार या अजित पवार यांच्या आठवणीने भावुक झाल्या. 'आज अजित पवार आपल्यात नाहीत', असं म्हणत सुनेत्रा पवार यांना भाषणादरम्यान गहिवरून आलं होतं. पुढे बोलताना सुनेत्रा पवार यांनी सूचक इशारा दिला. 'आजपर्यंत सर्वांना समजून घेतलं, पण यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असल्यास विचार केला जाईल', असं भाष्य सुनेत्रा पवार यांनी केलं आहे.आज आपण राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा 27 वा वर्धापन दिन साजरा करत असताना एक वेगळ्या भावना आणि भावनिक वातावरणात आहोत. आपल्या सगळ्यांचे नेते अजितदादा आज आपल्यात नाहीत. त्यांच्याशिवाय होणारा हा पक्षाचा पहिलाच वर्धापन दिन आहे", असं म्हणत सुनेत्रा पवार भाषणादरम्यान भावुक झाल्या.

"यशवंतराव चव्हाण यांच्या सुसंस्कृत राजकारणाचा वारसा आपल्याला सर्वांनाच लाभलेला आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊनच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष पुढील वाटचाल करत आहे. अजित पवार यांना जो महाराष्ट्र अपेक्षित होता, तसा महाराष्ट्र उभा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध राहील असा मला विश्वास आहे", असंही सुनेत्रा पवार

पान 3 वर

# आईचा चारधाम दर्शनाचा संकल्प लेक करतेयं पूर्ण!
# ना. पंकजाताई मुंडेंनी आई आणि बहिण प्रीतमताईंसह द्वारकेत घेतले दर्शन



मुंबई दि. 11 --चारधाम यात्रेचे दर्शन घडवून आणण्याचा आईसाठी केलेला संकल्प राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे पूर्ण करत आहेत. आज त्यांनी आई प्रज्ञाताई व बहिण माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह द्वारकेत भगवान श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. याठिकाणी देशातील एकमेव असलेल्या गो हॉस्पिटलला भेट दिली तसेच पंतप्रधान मोदींच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल वृक्षारोपणही केले.

यासंदर्भात एक पोस्ट करत ना. पंकजाताईंनी आईचा चारधाम करण्याचा संकल्प पूर्ण करत असल्याचे म्हटले आहे. एक दिवस मिळाला की आई आणि बहिण प्रीतमताईंसह आम्ही निघालो.आज देवभूमी द्वारका येथे श्री द्वारकाधीश मंदिराचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी द्वारकाधीश मंदिर ट्रस्ट आणि भाजपा पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. काही दिवसांपूर्वीच ना. पंकजाताईंनी आईला घेऊन बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्रीला जाऊन दर्शन घेतले होते.

पान 3 वर


# आज ठळक
## एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेच्या केंद्र परिसरात जमावबंदी आदेश लागू

बीड ,दि.11(जिमाका):- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाणारी महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2026 ही रविवार दि.14 जून 2016 रोजी होणार आहे. बीड जिल्हा केंद्रावरील एकूण 21 उपकेंद्रावर दोन सत्रात ही परीक्षा पार पडेल. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून एकूण 5 हजार 881 उमेदवार बसले असून, परीक्षा काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. सर्व उपकेंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परीक्षा केंद्रांच्या 100 मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

आयोगाच्या नियमांनुसार, उमेदवारांना परीक्षा केंद्रावर मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर किंवा इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे तसेच अभ्यासाचे साहित्य घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे. मात्र, उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांना जेवणाचा डबा, अल्पोपहार आणि पाण्याची बॉटल सोबत आणण्यास परवानगी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, दोन्ही पेपरच्या मधल्या वेळेत उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांना केवळ आयोगाने नेमून दिलेले आवश्यक साहित्यच जवळ बाळगता येईल.

सर्व उमेदवारांनी परीक्षेला येताना प्रवेशपत्रासोबत स्वतःचे मूळ ओळखपत्र आणि त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे बंधनकारक आहे. यामध्ये आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. उमेदवारांनी सकाळी 09:30 वाजेपूर्वी आपापल्या परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा सुरु झाल्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश दिला जाणार नाही, असेही कळविले आहे.

# "वैभव सूर्यवंशीला टीममध्ये संधी मिळाली; मला कधी?"
# मंत्रिपदावरुन धनंजय मुंडेंची सुनेत्रा पवारांसमोर जोरदार बॅटिंग!



मुंबई: "राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष एक नंबरचा करण्यासाठी आपल्याला सर्वांना संघर्ष आणि संकल्प करण्याची गरज आहे," असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या 27 व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या जाहीर कार्यक्रमात सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत बोलताना मुंडे यांनी आपल्या खास शैलीत राजकीय फटकेबाजी केली. यावेळी त्यांनी क्रिकेटचे उदाहरण देत, अप्रत्यक्षपणे कार्यकर्त्यांच्या भावना आणि स्वतःची मंत्रिपदाची इच्छा बोलून दाखवली. व्यासपीठावरून बोलताना धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांचे आभार मानले. "अजित पवार यांनी माझ्यासारख्या

पान 3 वर



रायगड - रत्नागिरी - सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून विधानपरिषदेवर बिनविरोध आमदार झालेले माझे लहान बंधू आ. अनिकेत भाई तटकरे यांचे आज मुंबई येथे भेटुन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# फसव्या कर्जमाफी निर्णयाची किसान सभेनी केली होळी
## परळी कृषी उत्पन्न बाजार समिती समोर निदर्शने



परळी वै ता 12 प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य किसान सभा, बीड जिल्हा समितीच्या वतीने गुरुवार ता 11रोजी सकाळी अकरा वाजता परळी कृषी उत्पन्न बाजार समिती समोर निदर्शने करण्यात येऊन राज्य सरकारच्या फसव्या कर्जमाफी निर्णयाची होळी करण्यात आली. कर्जमाफी, पीकविमा, देवस्थान व गायरान जमिनी, खते-बियाणे उपलब्धता तसेच शेतकरी हिताच्या इतर मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

अखिल भारतीय किसान सभेच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या

पान 3 वर

# शेतकऱ्यांच्या ठिय्या आंदोलनामुळे पोलीस बंदोबस्तात अनुदानित बियाण्याचे परळीत वाटप सुरु !
- माजी कृषीमंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्याने उपलब्ध झाले अनुदानित बियाणे !
- बियाणे,खते व औषधांची विक्री जास्त दराने करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्याची शेतकऱ्यांची मागणी !



परळी(प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागा मार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानित बियाण्यांसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषी कार्यालयाने परमिट देऊन सुद्द्धा कृषी सेवा केंद्रावर गेल्यावर बियाणे मिळत नसल्याने कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले,या आंदोलनामुळे व माजी कृषीमंत्री आ.धनंजयजी मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळे कालच सोयाबीनचे बियाणे आले व आज 11 जून रोजी परळी शहरातील संजय कृषी सेवा केंद्र,किसान सेंटर व रुक्मिणी ट्रेडर्स या कृषी सेवा केंद्रावर सकाळी 9 वा पासून कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत व पोलीस बंदोबस्तात बियाणांचे वाटप सुरु करण्यात आले.





याबाबत सविस्तर वृत्त कि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागा मार्फत शेतकऱ्यानी केलेल्या ऑनलाईन अर्जानुसार प्रथम येनारास प्रथम प्राधान्य या नियमाप्रमाणे मार्च खरीप हंगाम 2026 साठी परळी तालुक्यातील 1792 शेतकऱ्यासाठी 983 क्विंटल बियाणे मिळणे आवश्यक होते परंतु तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी केवळ 354.25 क्विंटलच बियाणे मिळाले,त्यामुळे उर्वरित 628 .75 ची आवश्यकता असताना सदरील बियाणे महाबीज कडून मिळाले नाही व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने या बियाणाची मागणी सुद्धा केली नाही,त्यामुळे

पान 3 वर







# अ.ब.क.ड. आरक्षण उपवर्गीकरणासाठी बीडमध्ये 'मातंग क्रांती मोर्चा'; हजारोंनी सहभागी व्हा : दशरथ कुचेकर
- "एक दिवस जातीसाठी, आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी" घोषवाक्याने समाजबांधवांना आवाहन



वडवणी | प्रतिनिधी अनुसूचित जातीतील अ.ब.क.ड. आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी, तसेच मातंग समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बीड जिल्ह्यातील सकल मातंग समाजाच्या वतीने 16 जून रोजी भव्य 'मातंग क्रांती मोर्चा' आयोजित करण्यात आला आहे. समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांसाठी लढणारा हा मोर्चा सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स (स्टेडियम) येथून जिल्हाधिकारी कार्यालय, बीडपर्यंत जाणार आहे.

हा लढा समाजाच्या येणाऱ्या पिढीच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून प्रत्येक समाजबांधवाने या ऐतिहासिक मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मानवी आमदार अमित गोरखे यांचे कट्टर समर्थक दशरथ कुचेकर यांनी केले आहे.

मोर्चामार्फत शासनाकडे अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडण्यात येणार आहेत. यामध्ये लहूजी साळवे अभ्यास

पान 3 वर

# डॉ.भरत मुंडे सर म्हणजे हजारो रुग्णांच्या आणि सर्वसामान्यांच्या गळ्यातील ताईत!



### विवेकानंद हॉस्पिटल या रोपट्याचे दहा वर्षात वटवृक्षात रुपांतर...

## टोकवाडी च्या भूमिपुत्राचे कौशल्य; रत्नेश्वरावर अपार श्रद्धा

'संस्कार संपन्न पुत्र ही सर्वात मोठी संपत्ती असते!' असे म्हणतात. किंबहुना खरी संपत्ती मुलगा आहे पैसा नाही. अगदी बालपणापासून संस्कार करायला हवेत असे सांगितले जाते आईच्या दुधापासून आणि आई-वडिलांच्या संस्कारातून शिकवन घेऊन मां साहेबांनी शिवरायावर संस्कार केले. अगदी त्या विचारधारेवर चालत भारतीय संस्कृतीमध्ये अनेक राष्ट्रपुरुषांनी राष्ट्रहित आणि समाज हितासाठी स्वतःला झोकून देत प्रेरणादायी काम केले आहे.

आजही सर्वसामान्य कुटुंबातून आलेली माणसे आपल्या पेशाशी अत्यंत प्रामाणिक राहून आपल्या जन्मभूमी आणि कर्मभूमीला अत्यंत जबाबदारीने न्याय देण्याचा प्रयत्न करतात. यात श्रीक्षेत्र रत्नेश्वर देवस्थानावर प्रचंड अपार श्रद्धा ठेवून आपल्या डॉक्टरी पेशाशी अत्यंत निष्ठेने कर्तव्य बजावत विवेकानंद रुग्णालयाच्या दहा वर्षांपूर्वी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर करून टोकवाडीच्या भूमिपुत्राने अलौकिक इतिहास निर्माण केला आहे. अर्थात त्यांचे नाव आहे डॉ.भरत मुंडे!

देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी परळी वैद्यनाथ हे एक अत्यंत पवित्र देवस्थान असलेले ज्योतिर्लिंग आहे. राज्य नव्हे, तर देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त या पवित्र भूमीत दर्शन घेऊन नतमस्तक होत आशीर्वाद घेतात. याच पवित्र परळी वैजनाथाच्या कुशीत असलेल्या टोकवाडीत डॉ. भरत मुंडे यांचे बालपण गेले. आपल्या पारिवारिक संस्कारातून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण घेऊन डॉक्टरकीची पदवी घेतल्यानंतर त्यांनी आपल्या व्यवसायाचा श्री गणेशा आपल्या मायभूमीतूनच केला...

डॉ.भरत मुंडे एम.एस.सर्जन आहेत.मागच्या दहा वर्षांपूर्वी परळी वैजनाथ येथे विवेकानंद हॉस्पिटल सुरु केले. गोरगरीब रुग्णांना दिवस रात्र सेवा दिली.. तसेच अतिशय गंभीर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या. डॉ. भरत मुंडे यांची पार्श्वभूमी व परिस्थिती अत्यंत नाजूक असून अतिशय गरीबीच्या परिस्थितीतून शिक्षण घेऊन झाले. दुर्दैवाने लहानपणीच वडिलांचं छत्र हरवलं.. आणि घरी अतिशय गरीबी. पण आपल्या आई-वडिलांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी अशा परिस्थितीतही त्यांच्या आई वरिष्ठ बंधूंनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले.

अत्यंत जिद्दीने उच्चशिक्षण झाल्यानंतर त्यांनी संघर्ष करून पुढे विवेकानंद हॉस्पिटल ची स्थापना मोठ्या धाडसाने सुरुवात केली. दररोजची कर्तव्याची नियमितता, रुग्णांशी अत्यंत स्नेहाचा संवाद.. वास्तविकता आणि केवळ सेवा हा धर्म पाळत डॉ. भरत मुंडे यांनी प्रचंड मेहनत परिश्रम घेतले.... आणि पाहता पाहता गत दहा वर्षात विवेकानंद हॉस्पिटल या छोट्याशा रोपट्याचा विशाल वटवृक्ष झाला!

विवेकानंद हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. भरत मुंडे यांनी सामाजिक बांधिलकीचा भाव सदैव जोपासला. त्यांच्या स्वामी विवेकानंद हॉस्पिटल व विवेकानंद सामाजिक सेवा प्रतिष्ठान च्या माध्यमातून जन्मभूमी टोकवाडी गावामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवले. त्यामध्ये मोफत रोग निदान तपासणी शिबिर, डोळ्यांचे शिबिर, महिलांसाठी रांगोळी स्पर्धा.. तसेच हॉस्पिटलच्या वर्धापन दिना निमित्त 'टोकवाडी भूषण' पुरस्काराचे आयोजनही त्यांनी केले! तसेच 14 एप्रिल ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी व्यसनमुक्तीचा कार्यक्रम गावामध्ये घेतला. असे विविध सामाजिक उपक्रम ते सदैव राबवतात. त्यांनी साहित्य क्षेत्रातही त्यांचे मौलिक योगदान आहे. आपल्या कवितांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य ते करत असतात. विविध ठिकाणी काव्य संमेलनाला उपस्थित असतात. त्यांच्याकडे पाहिलं तर एक साक्षात अष्टपैलू व्यक्तिमत्व आपल्या समोर येतेय,हे सत्य आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. भरत मुंडे यांच्या या अत्यंत समाज हितदक्ष आणि रुग्णांच्यासाठी तसेच सर्वसामान्यांसाठी आदर्शवत असलेले कार्य सदैव, अखंड, निरंतर सुरु राहावे..या अपेक्षासह त्यांच्या अभिष्टचिंतन दिनाच्या निमित्ताने त्यांना आनंदी, यशदायी आणि निरोगी दीर्घायुष्यासाठी रत्नेश्वराच्या चरणी विनम्र प्रार्थना!

**• रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा म्हणणारे डॉक्टर!**

डॉ. भरत मुंडे हे अत्यंत संवेदनशील मनाचे विविध क्षेत्राशी नाते जोडणारे प्रमाणिक स्थितप्रज्ञ डॉक्टर आहेत. सामाजिक कार्याची आवड ठेवून त्या बांधिलकीतून काम करणारे आहेत. एक कवी मनाचा डॉक्टर आणि सतत धडपडत राहणारे व्यक्तिमत्व आहे. डॉक्टर भरत मुंडे यांचं व्यक्तिमत्व विविध अंगी असून प्रतिभा संपन्न आहे.

**• रत्नेश्वरावर अपार श्रद्धा; भक्ती आणि पावित्र्याचे नाते!**

डॉ.भरत मुंडे यांचे टोकवाडी करांचे आराध्य दैवत असलेल्या श्री रत्नेश्वरावर अपार श्रद्धा आणि पावित्र्यपुर्ण भक्ती आहे. रत्नेश्वर डोंगरावर विराजमान आहेत. त्यांची रत्नेश्वरावर फार श्रद्धा असून त्यांचं आणि रत्नेश्वराचं एक अतुट नातं निर्माण झालेलं आहे! उत्तम विचार, दृष्टी आणि कृती श्रेष्ठ पदावर नेते, याची अनुभूती डॉ. भरत मुंडें च्या माध्यमातून अनुभवायला येते, हे नक्की!

**विशेष लेख -बालासाहेब फड**

**शब्दांकन-प्रा.बिभिषण चाटे**

---

# माझ्या लाडक्या बाळा, भरपूर शिकरं शाळा !!

जगामध्ये बालकांना कामगार म्हणून राबविले जाऊ नये आणि बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे. हा जागतिक बालकामगार विरोधी दिनामागचा मुख्य उद्देश आहे. जागतिक बालकामगार विरोधी दिनाची सुरुवात आंतरराष्ट्रीय कामगार संघटना- आयएलओने 12 जून 2002 रोजी केली. बाल कामगारांच्या जागतिक स्थितीवर लक्ष केंद्रित करणे आणि बालमजुरी पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे या उद्देशाने जागतिक बालकामगार विरोधी दिन साजरा करण्यात येतो. रोचक व सुबोध शब्दांतील श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा हा संकलित लेख वाचा... संपादक.

प्रत्येक जिल्ह्यात सध्या विशेष प्रशिक्षण केंद्रे विविध वस्त्यांमध्ये कार्यान्वित आहेत. प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनात शेकडो कर्मचारी काम करतात. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. बालकामगारांना अनौपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कौशल्य व कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध ट्रेडचे व्यवसायपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते तसेच प्रकल्पाचे कार्य व बालकामगार प्रथेविषयी जनमानसात जनजागृती करण्यात येते. प्रत्येक बालकामगाराला दरमहा 150 रुपये विद्यावेतन देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी मित्र अभ्यासक्रमाचा विशेष प्रशिक्षण केंद्रात अवलंब करण्यात येतो, शालेय पोषण आहार, पाठ्यपुस्तके आणि आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात, बालकामगारांना त्यांच्या आवडीनुसार तसेच त्यांच्यातील कौशल्यास अनुरुप असे व्यवसाय पूर्ण प्रशिक्षण देण्यात येते, बालकामगारांना विविधांगी उपक्रमातून शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात येते. तसेच जीवन कौशल्य राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत बालकामगारांना जीवन कौशल्य विषयाचा प्रभावी संवाद कौशल्य, स्वतःची जाणीव, प्रभावी नेतृत्व, निर्णयक्षमता, ध्येय निश्चिती, भावनिक समायोजन, कल्पकता, निरीक्षण निरोगी जीवन यासारख्या विविध विषयांच्या माध्यमातून भावी आयुष्यात सुजाण नागरिक घडविण्याचे प्रयत्न केले जातात. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात प्रकल्पाचे कामकाज सुयोग्यरित्या सुरु आहेत. प्रकल्पाच्या सुरुवातीपासून लक्षावधी बालकामगारांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे. तसेच प्रकल्पामार्फत बालकामगारांना जन्म दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, संजय गांधी निराधार योजना, सुकन्या योजना, मतदान ओळखपत्र, जीवनदायी योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यासाठी राज्य शासनाने सन 1986 सालापासून बालकामगार विरोधी कायदा बनविला असून या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाल्यास भविष्यात बालकामगार होण्यास आळा बसेल.

"लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा"... असे आपण नेहमी म्हणतो. कारण बालपणीचा काळ सुखाचा आणि आनंदाचा असतो. ना कसली चिंता ना कसली काळजी, मनसोक्त खेळा, हसा, आनंद लुटा... पण असा हा सुखाचा काळ काही मोजक्याच मुलांच्या नशिबात असतो. कारण जेव्हा आपण घराबाहेर पडून समाजात वावरतो तेव्हा पोटाची खळगी भरण्यासाठी सिग्नलजवळ काही वस्तू विकणारी मुले, हॉटेल, बसस्थानक, रेल्वे स्टेशनवर पाणी वाटणारी, टेबल साफ करणारी मुले पाहतो. अशा मुलांना कुठे सुखाचे बालपण अनुभवायला मिळते? कायदा असूनही त्यांचे बालपण हरवत चालले आहे. हेच ते बालकामगार! 14 वर्षांखालील जी मुले स्वतःच्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार करतात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी घासायची, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात. एकीकडे बोट ठेवलं ती वस्तू विकत घेऊन देणारी हौशी मॉम-डॅड तर दुसरीकडे कामावर पाठविणारी नाईलाज मायबाप. समाजातील हे चित्र कसे बदलेल आणि कोण बदलणार? हा समाजापुढे गहण प्रश्नच आहे. 12 जून हा दिवस देशासह जगात सर्वत्र बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येत आहे.

सन 1986मध्ये पहिला बालकामगार बंदी आणि नियमन कायदा आला. त्या कायद्यानुसार 14 वर्षांखालील मुलांना मजुरी करणे बेकायदेशीर सांगितले. सन 2002मध्ये बालकामगार थांबविणे किंवा बंदी घालण्याचा सर्वानुमते कायदा मंजूर केला. त्या कायद्यानुसार 14 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचे शोषण करणे हा गुन्हा मानला गेला. भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद 23 हा मुलांना धोकादायक उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यास परवानगी देत नाही. कलम 45 अंतर्गत देशातील सर्व राज्यांना 14 वर्षांखालील मुलांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक ठरविले. जिल्ह्या-जिल्ह्यात 2004 पासून जिल्हधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविले जात आहेत. या प्रकल्पांतर्गत 9 ते 14 वयोगटातील धोकादायक, व्यवसायामध्ये काम करणाऱ्या बालकामगारांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यात येते. प्रकल्पाचा मुख्य उद्देश बालकामगारांचा त्यांच्या कामापासून

---

# भेसळमुक्त अन्नाची लढाई : जगाचा अनुभव आणि महाराष्ट्राची दिशा

**डॉ. भारत कऱ्हाड**



## 'अन्नभेसळ हा केवळ कायद्याचा प्रश्न नसून पब्लिक हेल्थ, सोशल ट्रस्ट आणि सुशासनाशी संबंधित जागतिक आव्हान

अन्न ही माणसाची मूलभूत गरज आहे. सुरक्षित, शुद्ध आणि सकस अन्न हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. परंतु आजच्या काळात अन्नातील भेसळ हा केवळ एखाद्या शहराचा, राज्याचा किंवा देशाचा प्रश्न राहिलेला नाही. जागतिकीकरणामुळे अन्न उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक आणि विक्री यांचे स्वरुप बदलले आहे. त्यामुळे फूड सेफ्टी हा विषय आता जागतिक चर्चेचा भाग बनला आहे. महाराष्ट्रात अलीकडे अन्न व औषध प्रशासनाने भेसळविरोधात सुरु केलेल्या कारवायांमुळे हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या निमित्ताने जगातील अनुभव आणि महाराष्ट्राची दिशा यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

अन्नातील भेसळ हा प्रकार नवीन नाही. इतिहासात अनेक देशांनी या समस्येचा सामना केला आहे. एकेकाळी अमेरिका, युरोप आणि इतर विकसित देशांमध्येही अन्नामध्ये निकृष्ट पदार्थ मिसळणे, चुकीचे लेबलिंग करणे आणि ग्राहकांची फसवणूक करणे हे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत होते. मात्र या देशांनी कालांतराने मजबूत कायदे, वैज्ञानिक तपासणी यंत्रणा, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि प्रभावी अंमलबजावणी यांद्वारे या समस्येवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे आज ते देश फूड सेफ्टीच्या बाबतीत आदर्श मानले जातात.

अमेरिकेच्या इतिहासात हार्वे वॉशिंग्टन वायली यांचे नाव विशेष महत्त्वाचे मानले जाते. त्यांना "शुद्ध अन्न व औषध चळवळीचे जनक" म्हणून ओळखले जाते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांनी अन्नभेसळीविरोधात व्यापक मोहीम उभारली. वैज्ञानिक संशोधन, जनजागृती आणि कायदेशीर सुधारणा यांच्या माध्यमातून त्यांनी अन्नसुरक्षेचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर पोहोचविला. त्यांच्या प्रयत्नांमुळे 1906 मध्ये 'शुद्ध अन्न आणि औषधे कायदा' अस्तित्वात आला. हा कायदा अमेरिकेतील आधुनिक फूड सेफ्टी व्यवस्थेचा पाया मानला जातो. या इतिहासातून एक महत्त्वाचा धडा मिळतो की, समाजाच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात; त्यासाठी दृढ इच्छाशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक पाठिंबा आवश्यक असतो.

युरोपियन देशांनी अन्नसुरक्षेला अधिक व्यापक स्वरुप दिले आहे. युरोपियन युनियनमध्ये ट्रेसेबिलिटी सिस्टीम अत्यंत प्रभावीपणे कार्य करते. एखादा अन्नपदार्थ कोणत्या शेतातून आला, कोणत्या कारखान्यात प्रक्रिया झाला आणि कोणत्या दुकानात विकला गेला याची संपूर्ण माहिती उपलब्ध असते. त्यामुळे भेसळ किंवा गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्वरित कारवाई करणे शक्य होते. जपानमध्ये अन्नाच्या गुणवत्तेला सामाजिक प्रतिष्ठेचा विषय मानले जाते. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये "फार्म टू फोर्क" मॉडेलच्या माध्यमातून संपूर्ण फूड सप्लाय चेनवर नियंत्रण ठेवले जाते. या सर्व उदाहरणांतून अन्नसुरक्षा ही केवळ सरकारी जबाबदारी नसून सामाजिक संस्कृतीचा भाग बनली पाहिजे, हे स्पष्ट होते.

सोशल पर्स्पेक्टिव्हमधून पाहिले तर अन्नातील भेसळ हा विश्वासघाताचा प्रकार आहे. कोणत्याही समाजातील आर्थिक व्यवहार परस्पर विश्वासावर उभे असतात. ग्राहक एखादी वस्तू विकत घेताना ती सुरक्षित आणि दर्जेदार असेल, अशी अपेक्षा करतो. जेव्हा नफेखोरीसाठी अन्नामध्ये भेसळ केली जाते, तेव्हा ग्राहकांचा विश्वास डळमळीत होतो. याचा परिणाम केवळ त्या व्यवहारापुरता मर्यादित राहत नाही; तर संपूर्ण बाजारव्यवस्थेवर होतो. प्रामाणिक व्यापाऱ्यांचे नुकसान होते आणि समाजातील नैतिक मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. म्हणूनच अन्नभेसळ ही सामाजिक नैतिकतेची समस्या देखील आहे.

पब्लिक हेल्थच्या दृष्टीने हा प्रश्न अधिक गंभीर आहे. भेसळयुक्त अन्नामुळे तात्काळ विषबाधा होऊ शकतेच; परंतु दीर्घकालीन स्वरुपात त्याचे परिणाम अधिक घातक असतात. कृत्रिम रंग, निकृष्ट रसायने, बनावट घटक आणि हानिकारक मिश्रणांमुळे यकृत, मूत्रपिंड, पचनसंस्था आणि इतर अवयवांवर परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये कर्करोगासारख्या गंभीर आजारांचाही धोका वाढू शकतो. लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्ती यांना त्याचा सर्वाधिक फटका बसतो. त्यामुळे अन्नभेसळ हा केवळ कन्झ्युमर प्रोटेक्शनचा विषय नसून सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणाचा मूलभूत प्रश्न आहे.

भारतात अन्न सुरक्षा व मानके कायदा, 2006 आणि या कायद्याच्या माध्यमातून अन्नसुरक्षेसाठी संस्थात्मक चौकट निर्माण करण्यात आली आहे. तथापि, देशाची प्रचंड लोकसंख्या, विशाल बाजारपेठ, असंघटित उत्पादन व्यवस्था आणि जागरुकतेतील असमानता यांमुळे आव्हाने कायम आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात सुरु असलेल्या अन्नभेसळविरोधी कारवायांचे महत्त्व अधिक वाढते. अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या धाडी, तपासण्या आणि कारवायांमुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. या कारवायांचे खरे महत्त्व केवळ जप्ती किंवा गुन्हे दाखल करण्यात नाही, तर समाजामध्ये निर्माण झालेल्या जागरुकतेत आहे.

महाराष्ट्राने विकसित देशांच्या अनुभवातून शिकण्याची गरज आहे. जिल्हास्तरावर अत्याधुनिक फूड टेस्टिंग लॅब्स उभारणे, डिजिटल ट्रेसेबिलिटी सिस्टीम विकसित करणे, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या साहाय्याने मॉनिटरिंग अधिक प्रभावी करणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करणे आणि नागरिकांमध्ये कन्झ्युमर अवेअरनेस वाढविणे या उपाययोजना आवश्यक आहेत. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमार्फत अन्नसुरक्षेबाबत व्यापक जनजागृती करणे देखील महत्त्वाचे आहे.

अखेरीस, भेसळमुक्त अन्न ही केवळ शासनाची किंवा प्रशासनाची जबाबदारी नाही. ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. विकसित देशांचा अनुभव सांगतो की मजबूत संस्था, कठोर कायदे, आधुनिक तंत्रज्ञान आणि जागरुक नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांमधूनच फूड सेफ्टी संस्कृती निर्माण होते. महाराष्ट्रात सुरु असलेली अन्नभेसळविरोधी मोहीम ही त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल मानता येईल. ही लढाई केवळ भेसळखोरांविरोधात नाही; तर निरोगी समाज, सुरक्षित भविष्य आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी आहे. जनतेच्या ताटात सुरक्षित अन्न पोहोचणे हीच कोणत्याही प्रगत आणि संवेदनशील समाजाची खरी ओळख असते.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

---

# शिक्षणाधिकारी यांच्या आदेशाला संस्था सचिव, मुख्याध्यापक यांनी दिली केराची टोपली स्थगित उपोषण पुन्हा सुरू

## मराठवाडा शिक्षक संघाच्या नेतृत्वाखाली सहशिक्षकांचे सहकुटुंब आमरण उपोषण



छत्रपती संभाजीनगर मुर्डेश्वर शिक्षण संस्था संचालित शांताई प्राथमिक विद्यालय या शाळेतील शिक्षकांची संस्था सचिव आणि मुख्याध्यापकांनी शिक्षकांची आर्थिक फसवणूक, शासनाची आर्थिक लूट होत असल्याने या शाळेतील सहशिक्षक रावसाहेब तुकाराम बोरसे, रवींद्र दामोदर मगर, रामेश्वर देविदास गोराडे, अजित शेषराव जाधव, सागर संजीव सूर्यवंशी, संभाजी हनुमंता जाधव, सचिन नारायण मुसळे हे मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक 11 जून 2026 वार गुरुवार रोजी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी प्राथमिक कार्यालयासमोर सहकुटुंब आमरण उपोषण सुरु केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक संदिप लक्ष्मण काजळे हे आहेत. संस्था सचिव लक्ष्मण ओंकार काजळे व अध्यक्षा श्रीमती संगीता लक्ष्मण काजळे हे शासनाची आर्थिक लूट करीत मनमानी कारभार करून शाळेतील शिक्षकांचे माहे मे 2026 चे वेतन रोखलेले आहे शिक्षण विभागाच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. व शिक्षणाधिकारी कार्यालय यांच्या मनमानी कारभारावर कठोर कारवाई न करता यांना मदतच करीत आहेत, असा आरोप मराठवाडा शिक्षक संघाने केलेला आहे

शाळेतील मुख्याध्यापकांनी नियमबाह्यरीत्या तुकडी वर्गाचा वाढीव टप्पा पगार मूळ वर्गाला दिलेला आहे. तो वाढीव टप्पा शासन निर्णयानुसार तुकडी वर्गांच्या शिक्षकांच्या पगारी खात्यावर जमा करण्यात यावा.

सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत अद्यावत करून तात्काळ शिक्षकांना देण्यात यावी. शाळेतील ज्या शिक्षकांनी बारा वर्षाचा कालावधी पूर्ण केलेला आहे व वरिष्ठ वेतन श्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे अशा शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. शाळेत रुजू करून घेत असताना शाळेतील मुख्याध्यापक, संस्था सचिव व अध्यक्षा यांनी सर्व कर्मचाऱ्यांकडून दहा कोऱ्या कागदांवर स्वाक्षरी करून घेतलेल्या आहेत. तसेच शाळेतील सर्व शिक्षकांना धमकावून स्वाक्षरी सह राजीनामा व काही आक्षेपार्ह मुद्दे लिहून घेऊन त्यावर दिनांक नसलेले 15 कागदपत्रे घेतलेली अद्याप शिक्षकांना दिलेली नाही ते तात्काळ देण्यात यावेत. शाळेतील मूळ वर्गावरील शिक्षक व तुकडी वर्गावरील शिक्षक यांना समान कामे वाटप करण्यात यावी. या प्रमुख मागणीसाठी मराठवाडा शिक्षक संघाचे महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, कृष्णा गोंडे, विलास चव्हाण, शैलेश पाटील, डॉ. पद्माकर पगार, मानसी भागवत, अरुणा चौधरी या संघटनेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी आमरण उपोषणाला पाठिंबा दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

यावेळी म्हणाल्या आहेत.शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची राष्ट्रवादीची विचारधारा पुढे घेऊन जाणं याचाच अर्थ सर्वांना बरोबर घेऊन जाणं आहे. देशाचा स्वातंत्र्य लढा असेल किंवा संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन असेल, येथील प्रत्येक तळागाळातील प्रत्येक घटकांनी यासाठी मोलाचं योगदान दिलेलं आहे", असंही सुनेत्रा पवारांनी म्हटलं आहे.आजच्या आपल्या वर्धापन दिनाची जी थीम ठरवली होती, ती थीम म्हणजे समर्पन, संघर्ष आणि संकल्प. ही संकल्पना आणि यंदाचा वर्धापन दिन अजितदादांना समर्पित केलेला आहे. अजित पवारांनी पक्षाच्या बळकटीसाठी गेले अनेक वर्ष पूर्णपणे स्वत:ला समर्पित केलं होतं. त्यामुळे आपण सुरुवातीलाच अजितदादांसाठी ही समर्पनाची भूमिका घेतली आहे", असंही सुनेत्रा पवारांनी म्हटलं आहे.शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. अजित पवार यांच्या कामाची पद्धत कोणालाही नवीन नव्हती. अजित पवार यांनी राज्याच्या प्रगतीसाठी सातत्याने संघर्ष केला. शेतकरी, युवक, महिला, उद्योजक, वंचित घटक अशा सर्वांना न्याय मिळावा, यासाठी अजित पवार यांनी प्रयत्न केले. अजित पवारांनी नेहमीच विकासाला प्राधान्य दिलं. त्यांनी लोकहितासाठी काम केलं. अजितदादा आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार नेहमी मार्गदर्शक ठरतील. राष्ट्रवादीला बळकटी देऊन पुढे नेण्याचा दादांचा संकल्प असायचा. त्यांचा हाच संकल्प आपल्याला पुढे घेऊन जायचं आहे", असं सुनेत्रा पवारांनी म्हटलं आहे.अजित पवार यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. हे वास्तव आहे. मात्र, अजित पवार यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग आणि सर्वसामान्य माणसांसाठी त्यांची बांधिलकी हीच आपल्या पक्षाची सर्वात मोठी ताकद आहे. यावर माझा विश्वास आहे. अजित पवार यांच्या पाश्चात राष्ट्रवादी पक्ष माझ्या पाठीशी एक कुटुंब म्हणून उभा राहिला, याची मला जाणीव आणि अभिमान देखील आहे. याची जबाबदारी किती मोठी आहे हे देखील मला माहिती आहे", असंही त्या म्हणाल्या आहेत.तीन वर्षांपूर्वीच अजित पवार यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची धुरा सांभाळली. त्यांना अवघ्या अडीच वर्षांचाच कालवधी मिळाला. हा कालावधी मर्यादित असला तरी त्यांनी पक्षाला राष्ट्रीय स्थरावर ओळख मिळवून दिली. अजित पवार यांची ओळख फक्त राजकारणी किंवा समाजकारणी म्हणून नव्हती तर सर्वसामान्यांसाठी आपल्या जीवाभावाचा माणूस अशी होती", असंही सुनेत्रा पवार म्हणाल्या.योग्यवेळी प्रत्येकाला न्याय आणि संधी मिळेल याची खात्री मी देते. आतापर्यंत पक्षात जे घडलं, त्याबाबत प्रत्येकवेळी मी सर्वांना समजून आणि सावरुन घेतलं. अजित पवार यांनी त्यांच्या हयातीत सर्व कार्यकर्त्यांना खूप समजून घेतलं. सर्वांचे हट्ट पुरवले, प्रेम केलं, मानसन्मान केला, पदे दिली. अजित पवार यांनी त्यांच्या प्रयत्नाने सर्वकाही देण्याचा प्रयत्न केला. यापुढे मी पक्षाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देईल. कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप असेल तर नक्की विचार केला जाईल. अजित पवार ज्या प्रमाणे पक्ष हितासाठी कठोर निर्णय घेत होते, त्या प्रमाणे खरं तर माझ्या स्वभावाप्रमाणे ते मला जड जाईल. मात्र, न्याय देण्यासाठी अजितदादांच्या पावलावर पाऊल ठेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करेन. पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते माझ्याबरोबर कायम असतील असा मला विश्वास आहे", असं म्हणत सुनेत्रा पवार यांनी सूचक इशारा दिला.

---

भारतातील एकमेव आएसओ मानांकित गोमातेचे रुग्णालय असलेल्या 'द्वारकाधीश गो हॉस्पिटल' येथे ना. पंकजाताईंनी भेट देऊन पाहणी केली. गोसेवेचे हे अद्ययावत कार्य अतिशय कौतुकास्पद आहे. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष रामजीभाई मैजीठीया, अशोक राजा व इतर सहकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश 12 वर्षे अविरतपणे विकासाच्या वाटेवर अग्रेसर आहे. देशातील सर्वात जास्त काळ पंतप्रधान म्हणून नेतृत्व करण्याचा ऐतिहासिक विक्रम त्यांनी कालच केला. याच औचित्याने आज देवभूमी द्वारका येथे स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांसमवेत ना. पंकजाताईंनी वृक्षारोपण केले.

---

रस्त्यावरच्या खड्याला घडवले आणि तीच दृष्टी आता मला सुनेत्रा पवार यांच्यामध्ये पाहायला मिळत आहे," असे मुंडे म्हणाले. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसला महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनवण्यासाठी सर्वांनी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमात सुरु असलेल्या खेळाच्या विषयाचा धागा पकडत धनंजय मुंडे यांनी उपस्थितांची मने जिंकली. स्टेजवर उपस्थित नेत्यांकडे पाहत ते म्हणाले, "व्यासपीठावर बसलेल्या सर्व नेत्यांना संधी मिळाली आहे. पण समोर बसलेले लोक विचारत आहेत की, क्रिकेटच्या खेळात आम्ही फक्त '12 वे खेळाडू' म्हणून आणि दुसऱ्यांच्या पाण्याचे ग्लास उचलण्यातच राहणार का? आम्हाला कधी मुख्य संघात खेळण्याची संधी मिळणार? मी आज फक्त तुमच्या भावना स्टेजवर मांडल्या आहेत, कारण मीसुद्धा तुमच्यातलाच एक आहे."या विधानातून मुंडे यांनी कार्यकर्त्यांच्या मनातील खदखद मांडतानाच, स्वतःसाठीही मंत्रिपदाची इच्छा अप्रत्यक्षपणे व्यक्त केल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.पक्षातील संधी आणि निष्ठेवर बोलताना मुंडे यांनी थेट क्रिकेट विश्वातील उदाहरणे दिली. "खेळ असो वा राजकारण, एक गोष्ट निश्चित आहे. ज्या सूर्यकुमार यादवने देशाला वर्ल्ड कप जिंकून दिला, त्याला काही वेळा संघात स्थान मिळत नाही; तर दुसरीकडे वयाच्या अवघ्या 15 व्या वर्षी वैभव सूर्यवंशीला थेट संघात संधी मिळते. याचाच अर्थ असा की, पक्षाने कार्यकर्त्याच्या कर्तृत्वाला, त्याच्या निष्ठेला आणि कामाच्या मूल्यांकनाला सर्वश्रेष्ठ स्थान देणे गरजेचे आहे. जर आपण हे करु शकलो, तरच अजितदादांचे महाराष्ट्रातील स्वप्न आपण पूर्ण करु शकू," असेही धनंजय मुंडे यांनी ठामपणे सांगितले.

---

पार्श्वभूमीवर गुरुवार ता 11 रोजी सकाळी 11 वाजता परळी कृषी उत्पन्न बाजार बाजार समितीसमोर शेतकरी एकत्र येऊन सरकारच्या चुकीच्या शेतकरी धोरणा विरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. शेतकऱ्यांसाठी व्यापक स्वरूपाची कर्जमाफी लागू करावी, कर्जमाफीतील जाचक अटी व शर्ती रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा मिळालेला नसल्याने खरीप 2025 हंगामासाठी मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्याप्रमाणे प्रतिहेक्टर किमान 17,500 रुपयांची भरपाई देण्यात यावी, देवस्थान व गायरान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर त्या जमिनी करण्याची कार्यवाही तातडीने करावी, डीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात खते आणि बियाणे उपलब्ध करून द्यावीत, खते-बियाण्यांमधील भेसळ, कृत्रिम टंचाई आणि चढ्या दराने होणारी विक्री रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करावी यासाठी किसान सभेने सरकारी निर्णयाची होळी करून निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ मुरलीधर नागरगोजे, कॉ पी एस घाडगे, कॉ पांडुरंग राठोड, कॉ भगवान बडे, कॉ विष्णु देशमुख, कॉ बालासाहेब कडभाने, कॉ किरण सावजी, कॉ पप्पु देशमुख, कॉ अशोक नागरगोजे, कॉ शेख इस्माईल, कॉ ब्रम्हानंद देशमुख, कॉ शंभुलिंग स्वामी, कॉ शेख खय्युम यांच्या सह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

तालुक्यातील शेतकरी मागील 5 दिवसापासून मोंढा मार्केट मधील संजय कृषी सेवा केंद्र,किसान सेंटर व रुक्मिणी ट्रेडर्स या अधिकृत कृषी सेवा केंद्रावर आपले काम सोडून दिवस - दिवस बसत होते,परंतु त्यांना बियाणे मिळत नसल्याने शेतकऱ्यांना प्रचंड त्रास व मनस्ताप सहन करावा लागत असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन करून आपली मागणी मांडली,त्यावेळी 09 जून 2026 रोजी तालुका कृषी अधिकारी यांनी उर्वरित 628 क्विंटलची मागणी केली,यावेळी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजी कृषीमंत्री यांना अनुदानित बियाणांचा विषय सांगितला असता त्यांनी तात्काळ दखल घेऊन राज्याचे कृषीमंत्री मा.ना.दत्तामामा भरणे साहेब व जिल्हा कृषी अधीक्षक यांच्या सोबत संपर्क करुन परळी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदानित बियाणे त्वरित देण्याची मागणी केली,शेतकऱ्यानी केलेल्या ठिय्या आंदोलनामुळे व माजीमंत्री आ.धनंजयजी मुंडे यांच्या वरिष्ठ स्तरावरील पाठपुराव्यामुळे उर्वरित बियाणे तालुक्याला उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे,त्याच बरोबर सर्व प्रकारचे बियाणे,खते व औषधांची विक्री जास्त दराने करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्याची मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली आहे.

---

आयोगाच्या सर्व शिफारशींची अंमलबजावणी, अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण, विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती व वस्तीगृह सुविधा, तसेच मातंग समाजाचा विविध क्षेत्रांतील अनुशेष भरुन काढण्याची मागणी प्रमुख आहे.

याशिवाय सोशल मीडियावर मातंग समाज व महापुरुषांविषयी आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच डॉ. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर करावा आणि अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाला 1000 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणीही मोर्चेकऱ्यांनी केली आहे.

दरम्यान, आरक्षण उपवर्गीकरणासाठी सातत्याने लढा देणारे नेते अमित गोरखे, सुधाकर भालेराव, लक्ष्मणराव ढोबळे, विष्णूभाऊ कसबे, सचिनभाऊ साठे आणि राजेश घोडे यांना कथित धमक्यांच्या पार्श्वभूमीवर झेड सुरक्षा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

"एक दिवस जातीसाठी, आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी" या घोषवाक्यासह आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चात मातंग समाजातील युवक, महिला, विद्यार्थी व नागरिकांनी विक्रमी संख्येने सहभागी होऊन समाजाची एकजूट दाखवावी, असे आवाहन दशरथ कुचेकर यांनी केले आहे.

---

## पान 4 वरुन

आरोपीचे दोन अनोळखी साथीदार मोटारसायकलसह आले. तेथे आरोपी वैजनाथ यादव याने फिर्यादीला पैसे दे नाहीतर तुझा जीव घेईन'अशी धमकी देत शिवीगाळ सुरु केली. त्यानंतर तिन्ही आरोपींनी बाजूला पडलेल्या लाकडी काठीने आणि बेल्टने फिर्यादीला पाठीवर, डोक्यावर व पायावर बेदम मारहाण केली. "जर आरडाओरडा केला किंवा पोलिसांत तक्रार केली, तर तुला जिवंत ठेवणार नाही," अशी धमकी देऊन आरोपींनी तिला दुपारपर्यंत तेथेच डांबून ठेवले. दुपारनंतर फिर्यादीला सोडून आरोपींनी पळ काढला. या घटनेनंतर घाबरलेल्या अनिल पत्की यांनी नातेवाईकाना सांगितले. त्यानंतर रुग्णालयात उपचार घेऊन आज सायंकाळी परळी शहर पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी याप्रकरणी अपहरण, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

---

केले आहे. अशोक डक यांच्या या निर्णयाचे विविध स्तरातून स्वागत होत असून, दुःखद प्रसंगी साधेपणा आणि संवेदनशीलतेचा संदेश देणारा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

---

तिसऱ्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेत पाच सुवर्णपदकांची कमाई ( हॅट्रिक ) करून तिने भारतीय पॅरा जलतरण क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

आभाने गेल्या तीन राष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकूण 15 सुवर्णपदकांची कमाई करत सातत्यपूर्ण उत्कृष्टतेचा आदर्श निर्माण केला आहे. तिची ही कामगिरी केवळ बीड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

सध्या आभा बेंगळुरू येथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पॅरा जलतरण प्रशिक्षक शरथ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर प्रशिक्षण घेत आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आभाच्या कामगिरीत सातत्याने उल्लेखनीय सुधारणा होत असून राष्ट्रीय स्तरावर ती नवे विक्रम प्रस्थापित करत आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड प्रक्रिया देखील पार पडत असल्याने आभाच्या या यशामुळे तिच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील संधी अधिक बळकट झाल्या आहेत. तिच्या या ऐतिहासिक यशाबद्दल क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि विविध संघटनांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

"जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अशक्य वाटणारे ध्येयही गाठता येते," हे आभा गणेश मुंडे हिने आपल्या यशातून पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे.

---

यावेळी त्यांनी आशिष यांच्या यशाचे कौतुक करत पुढील शैक्षणिक व प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

एमपीएससीच्या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत लाखो विद्यार्थ्यांमधून निवड होणे हे मोठे यश मानले जाते. आशिष यांनी जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवून परळी शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील युवकांना स्पर्धा परीक्षांकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे.

यशामागे आई-वडिलांचे संस्कार, कुटुंबीयांचा पाठिंबा आणि आशिष यांची अथक मेहनत असल्याचे उपस्थितांनी यावेळी नमूद केले. माणिकनगर, शास्त्रीनगर तसेच परळी शहरातील नागरिकांच्या वतीने आयोजित सत्कार सोहळ्यात नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आशिष ढोपरे यांच्या पुढील वाटचालीस उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

---

बैठकीत न्यायालयीन प्रक्रियेची माहिती, मंत्रालय स्तरावरील हालचाली तसेच पुढील संघटनात्मक भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त पदवीधर अंशकालीन शासकीय कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

---

कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प युवा कीर्तनकार प्रकाश महाराज फड यांनी कळविले आहे

---

49 हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. तसेच यानंतर चोरट्यांनी चोर इतर तीन घरे फोडण्याचा प्रयत्न केला मात्र तेथील लोक जागे झाल्याने चोरटे पसार झाले आणि येथील प्रयत्न फसला आहे. ही घटना बुधवारी (दि.9) मध्यरात्री 11 ते 3:30 च्या दरम्यान घडली आहे. एकाच रात्री दोन ठिकाणी धाडसी चोरी आणि तीन ठिकाणी प्रयत्न झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तब्बल साडेचार तास गावात चोरटे चोऱ्या करीत असताना ही इतक्या वेळात पोलिसांचे राऊंड सध्या झाले नाही. यामुळे ग्रामीण भाग हा रामभरोसे सोडण्यात आल्याचे दिसून येत आहे. तब्बल 40 कि.मी. वर एक पोलीस ठाणे असल्याने संरक्षण पुरवणे अवघड बनले आहे. यामुळे जिल्ह्यात मोठ्या बाजारपेठांच्या गावात नवीन पोलीस ठाणे सुरु करण्यात यावेत अशी मागणी करण्यात येत आहे. या प्रकरणी महादेव करपे यांच्या फिर्यादीवरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस करीत आहेत.

---

कोट्यवधी रुपयांचा भोगस कारभार करण्यात आला आहे तरी अशा भोगस कारभाराला सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे त्यामुळे असा महाघोटाळा करणाऱ्या केज पंचायत समितीच्या 122 ग्रामपंचायतची व मनरेगा, घरकुल विभागाची चौकशी करुन सरपंच, ग्रामसेवक यांच्या वर कार्यवाही करुन सीईओ साहेब यांनी अशा भ्राष्ठाचारी सरपंच, ग्रामसेवक, अधिकारी यांना घरी बसवावे असे चर्चा सत्र केज तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिकान मध्ये सुरु झाले आहे.

---

काही नागरिकांनी कार्यालयाच्या आवारात अनधिकृत दलालांसारख्या व्यक्तींच्या वावराची तक्रार केली आहे. त्यामुळे कामासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना गैरमार्गाने पैसे मागितले जातात, अशी चर्चा आहे. यामुळे पंचायत समितीची प्रतिमा मलिन होत असल्याचे स्थानिकांचे मत आहे.

*कर्मचाऱ्यांवर नियंत्रणाची मागणी*

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे लक्ष घालून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. स्वच्छतागृहाची दुरुस्ती, पाणीपुरवठा सुरळीत करणे, वेळोवेळी स्वच्छता ठेवणे आणि कार्यालयातील शिस्त-शिस्तबद्धता वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अनधिकृत व्यक्तींचा वावर रोखण्यासाठी सुरक्षा व्यवस्था कडक करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

कार्यालय ही जनतेची सेवा घेण्याची जागा आहे. तेथे मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्यास आणि शिस्त न पाळल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास कमी होतो. त्यामुळे वरिष्ठांकडून कारवाईचा प्रसंग येऊ नये, यासाठी अंतर्गत तपासणी करून आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी नागरिक करत आहेत.

*प्रशासनाने दखल घ्यावी*

पंचायत समिती ही ग्रामीण विकासाचे केंद्रबिंदू आहे. त्यामुळे तेथील स्वच्छता, पारदर्शकता आणि शिस्त अबाधित राहणे गरजेचे आहे. प्रशासनाने या तक्रारींची दखल घेऊन पाहणी करून नियमानुसार कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

---

बुद्धविहार, डॉ.आंबेडकर चौक ते लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयापर्यंत काढली जाणार आहे.

**• समारोप कार्यक्रमाची रूपरेषा (दि. 12 जून 2026)**

धम्मरॅली सकाळी (यशोधरा बुद्धविहार ते सुंदरराव सोळंके महाविद्यालय) मुख्य कार्यक्रम सुरुवात सायंकाळी 5:00 वाजता, विद्यार्थी प्रमाणपत्र वाटप सायंकाळी 6:30 वाजता, धम्मदेसना सायंकाळी 7:00 ते 8:30, भोजनदान रात्री 8:30 वाजता

मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्यासाठी पू. भिक्खू धम्मशील थेरो यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विविध भिक्खू संघ आणि प्रतिष्ठित मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. यामध्ये उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांसह अनेक स्थानिक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यशोधरा बुद्धविहार ट्रस्ट व धम्मसंस्कार शिबिर संयोजन समितीने या सोहळ्यासाठी उपस्थित राहून धम्माचा लाभ घेण्याचे आवाहन माजलगावकरांना केले आहे.

---

नवीन रस्ता करायचा नसल्यास किमान पूर्ववत जसा रस्ता होता तसाकरून द्या अशी नागरिकांची मागणी आहे.अपघात झाल्यास गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा दुचाकी चालवताना या रस्त्यावर अनेक वेळा अपघात होऊन हात, पाय फॅक्चर झाले आहेत. अनेकांनादवाखान्यामध्ये लाखो रुपये खर्च करावे लागले आहेत केवळ गुत्तेदार आणि रस्ता उकडून ठेवल्याने ही अपघात होत आहेत. यापुढे अपघात झाल्यास गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी करत आहेत.प्रसूतीसाठी घेऊन जाताना पोटातच बाळ दगावलेशेतात राहणाऱ्या एका महिलेला प्रसूतीसाठी रिक्षा घेऊन जात असताना प्रवासादरम्यान रस्त्यावरील दगडांच्या अडथळ्यांमुळे त्या आईचे मूल पोटातच दगावले असल्याची घटना मागील काही दिवसांपूर्वी घडली आहे रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी नेमका विलंब का होतो आहे?वर्षभरापासून रस्ता उकळून ठेवून अद्याप केला जात नाही त्यास विलंब केला जातो आहे याचे नेमके कारण स्पष्ट होत नाही. अधिकाऱ्यांनी शतात्काळ गुत्तेदारावर कारवाई करून रस्ता तयार करून द्यावा अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येणार असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

---

# छत्रपती संभाजीनगर येथे सकल गोर बंजारा एस.टी. आरक्षण मेळाव्याचे आयोजन




छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :गोर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गामध्ये आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी सकल गोर बंजारा एस.टी. आरक्षण मेळावा रविवार, दि. 12 जुलै 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे नेतृत्व गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण करणार असून राज्यभरातील गोर बंजारा समाजबांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आयोजकांच्या मते, गोर बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या जीवनपद्धतीशी संबंधित असून विविध आयोगांनी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाची नोंद केली आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर विविध राज्यांमध्ये समाजाला वेगवेगळ्या प्रवर्गांमध्ये समाविष्ट करण्यात आल्याने समाजाचे विभाजन झाले असून एस.टी. आरक्षणाचा लाभ अद्याप मिळालेला नाही. या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून राज्यभर आंदोलन, उपोषणे, मोर्चे आणि जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

प्रा. संदेश चव्हाण यांनी सांगितले की, समाजाच्या एस.टी. आरक्षणाच्या मागणीबाबत शासनाने नेमलेल्या अभ्यास समितीचा अहवाल अद्याप जाहीर झालेला नसल्याने समाजात नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर पुढील आंदोलनाची दिशा ठरविणे, समाजाची एकजूट मजबूत करणे आणि आरक्षणाच्या प्रश्नावर व्यापक चर्चा घडवून आणणे या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा 'मंथन हॉल', एम.आय.टी. महाविद्यालय परिसर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी 11.00 वाजता होणार आहे. गोर सेनेसह विविध सामाजिक संघटना आणि समाजातील मान्यवर नेते या कार्यक्रमास उपस्थित राहणार असून राज्यभरातून लाखो समाजबांधव सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

"एक गोर...! सव्वा लाखेर जोर...!!" या घोषवाक्यासह आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास गोर बंजारा समाजातील युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# कर्णबधिर विद्यार्थिनी शाश्वती कांबळेची यशोगाथा : जिद्द, चिकाटी आणि परिश्रमांच्या बळावर

## एसएससी बोर्डात प्रथम क्रमांक

परभणी | प्रतिनिधीदिव्यांगत्व हे यशाच्या मार्गातील अडथळा नसून जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे स्व. रामराव कान्हेकर

निवासी मूकबधिर विद्यालय, परभणी येथील विद्यार्थिनी शाश्वती माधव कांबळे (बिट्टू) हिने आपल्या उल्लेखनीय यशातून सिद्ध करून दाखविले आहे. कर्णबधिर दिव्यांगत्वावर मात करत शाश्वतीने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून एसएससी बोर्डामध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याने तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शाश्वतीच्या या यशामुळे तिच्या आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावली असून त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आहेत. तिची जिद्द, कठोर परिश्रम, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचे हे यशस्वी फलित असल्याची भावना व्यक्त होत आहे.या प्रसंगी तिचे कौतुक करताना मान्यवरांनी सांगितले की, दिव्यांगत्व हे यशाच्या आड येत नाही. सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षण घेऊन आणि ज्ञानाची कसोटी पार करत उल्लेखनीय यश मिळविता येते, याचे जिवंत उदाहरण शाश्वती आहे. तिच्या या यशाने समाजातील अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळणार आहे.शाश्वतीच्या सत्कारप्रसंगी पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या. या यशामुळे तिच्यावर सामाजिक जबाबदारीही वाढली असून, भविष्यातही याच जिद्दीने प्रगती करत स्वतःचा, पालकांचा, शाळेचा आणि समाजाचा गौरव वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.संस्थेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद कान्हेकर, शाळेचे मुख्याध्यापक आर. जी. सोनवणे, तसेच शिक्षक प्रसाद कुलकर्णी, के. एल. शिंदे, आर. डी. लाशे, एस. डी. पोटभरे, ए. सी. हिंगोले, विठ्ठल घाटे, खरात सर, आळणे सर, कुंडकर, आगळे, अमोल, लहू पांढरे, राहुल राठोड, एस. पी. जायभाये, कोळेश्वर मॅडम, असोलेकर मॅडम, गवारी मॅडम, गाजरे मॅडम आणि कमल साळवे आदींनी शाश्वतीचे अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.शाश्वती कांबळे हिच्या या उल्लेखनीय यशामुळे स्व. रामराव कान्हेकर निवासी मूकबधिर विद्यालय, परभणीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, तिची यशोगाथा अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
शुक्रवार दि. 12 जुन 2026

# परळीत महिला महाविद्यालयातील कर्मचाऱ्यास घरातून घेऊन जाऊन अमानुष मारहाण

## तीन जणांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल...





परळी वैजनाथ: प्रतिनिधी...

परळी येथील महिला महाविद्यालयातील एका कर्मचाऱ्यास त्याच्या राहत्या घरातून गाडीवर बसवून घेऊन जाऊन अमानुष मारहाण करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध आणि त्याच्या दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध अपहरण आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.काल दि. 09 जून 2026 रोजी सकाळी ही धक्कादायक घटना घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार, फिर्यादी अनिल बाबुराव पत्की हे परळी येथील महिला महाविद्यालयात लिपिक म्हणून कार्यरत आहेत.आरोपी वैजनाथ यादव (रा. परळी) याच्यासोबत त्यांचे मागील काही वर्षांपासून पैशांचे व्यवहार होते. दिनांक 09 जून रोजी सकाळी 10 वाजता आरोपी वैजनाथ यादव फिर्यादीच्या घरी आला. व्यवहाराच्या बहाण्याने त्याने फिर्यादीला आपल्या दुचाकीवर बसवून कॉलेज रोड, काळ रात्री मंदिर आणि धारावती परिसरात नेले. नदीच्या पलीकडे एका निर्जन झाडीमध्ये त्याने गाडी थांबवली. त्या ठिकाणी पान 3 वर

# पत्रकारांच्या हक्काच्या ६० गुंठे जागेवर डल्ला टाकण्याचा प्रयत्न

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्र्यांकडे दाद मागणार – दीपक देशमुख



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी नगरपालिकेच्या कारभारात लोकशाहीपेक्षा हुकूमशाहीचेच वर्चस्व वाढत असल्याचा आरोप करत माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या जागेवर नमो उद्यान उभारण्याच्या हालचालींवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पत्रकारांच्या हक्काच्या जागेची प्रशासनाला आठवण करून देण्यासाठी नंदागौळ रोड परिसरातील संबंधित जागेवर प्रतिकात्मक उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार बालासाहेब कडबाने, प्रकाश सूर्यकर, आत्मलिंग शेटे, धीरज जंगले, बाबा शेख, धनंजय अरबुने, संतोष जुजगर, प्रल्हाद कडुकटले, बालाजी ढगे, सुकेशनी नाईकवाडे, संजीब रॉय, संदीप मस्के, बालाजी जगतकर, गौतम आगळे, पद्माकर भंडारे, नितीन चव्हाण यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते. पान 3 वर

# वाढदिवस साजरा न करण्याचा अशोक डक यांचा निर्णय

## – स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाच्या दुःखद पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना आवाहन



माजलगाव, ( अनंत घडसिंगे ):

कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबईचे माजी सभापती तथा कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगावचे संचालक अशोक गोविंदराव डक यांनी 12 जून रोजी असलेला आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

याबाबत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रासह ते स्वतःही अत्यंत शोकाकुल आहेत. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर यंदा वाढदिवस साजरा करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त मित्र, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी बॅनर, हार, तुरे, बुके आदींवर कोणताही खर्च करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. आपल्या सदिच्छा आणि प्रेम हेच कायम पाठिशी राहावे, हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद करत सर्वांचे लोकप्रिय असलेले अजित दादा हे वृक्षप्रेमी होते त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ सर्वांनी वृक्षारोपण करावे असे आवाहन देखील त्यांनी पान 3 वर

# पॅरा स्विमर आभा मुंडे ची पाच सुवर्णांची विजयी हॅट्रिक

## सलग तिसऱ्या वर्षी पॅरा स्विमर आभा गणेश मुंडेची सुवर्ण झेप; 5 सुवर्णपदके आणि 2 राष्ट्रीय विक्रमांची नोंद



बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील डाबी गावची सुवर्णकन्या तथा उदयोन्मुख पॅरा जलतरणपटू आभा गणेश मुंडे हिने 26 व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी करत सलग तिसऱ्या वर्षी आपल्या सुवर्ण वर्चस्वाची मोहोर उमटवली आहे. बेंगळुरु येथील Zee Swim Academy येथे 8 ते 10 जून 2026 दरम्यान झालेल्या जुनियर व सब ज्युनिअर राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत आभाने सलग तिसऱ्या वर्षी तब्बल 5 सुवर्णपदके जिंकत 2 नवीन राष्ट्रीय विक्रमांची (National Records) नोंद आपल्या नावावर केली.

देशभरातील आठरा राज्यांमधील अव्वल पॅरा जलतरणपटूंच्या उपस्थितीत झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आभाने आपल्या उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, अथक परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर तिच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत सुवर्ण यश संपादन केले. विशेष म्हणजे, सलग पान 3 वर

# एमपीएससी परीक्षेत यश

## आशिष उर्फ नंदू ढोपरे यांचा सभापती योगेश मेनकुदळे यांच्या हस्ते सत्कार



परळी वैजनाथ | प्रतिनिधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून पोलिस महासंचालक कार्यालयात लिपिक पदावर निवड झालेल्या परळी शहरातील माणिकनगर-शास्त्रीनगर परिसरातील सुपुत्र आशिष उर्फ नंदू गणेशराव ढोपरे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

परळी नगर परिषदेचे शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांच्या हस्ते आशिष ढोपरे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पान 3 वर

# संभाजीनगर येथे अंशकालीन कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक 13 जून रोजी

परळी, प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यातील शासकीय व निमशासकीय विभागांमध्ये कार्यरत तसेच सेवानिवृत्त झालेल्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक शनिवार, दि. 13 जून 2026 रोजी संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत कै. भानुदासजी चव्हाण स्मृती सभागृह, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा, संभाजीनगर येथे होणार आहे.

महाराष्ट्र राज्य सर्व पदवीधर शासकीय कर्मचारी संघटनेच्या वतीने ही बैठक आयोजित करण्यात आली असून, 27 ऑक्टोबर 2009 च्या शासन निर्णयानुसार सरळ सेवा भरती प्रक्रियेद्वारे शासन सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. 2005 पूर्वी विविध शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षे अंशकालीन स्वरूपात सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा ग्राह्य धरून ती नियमित करण्यात यावी तसेच त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी संघटनेने राज्य शासनाकडे अनेक वेळा निवेदने दिली आहेत.

मात्र शासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने संघटनेचे अध्यक्ष लतीफ पठाण यांनी राज्य शासनाविरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दोन रिट याचिका दाखल केल्या होत्या. या प्रकरणाचा निकाल 24 एप्रिल 2026 रोजी लागला असून, शासनाला संबंधित निवेदनांवर निर्णय घेण्यासाठी 12 आठवड्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर आयोजित पान 3 वर

# नि. मुख्यअभियंता मोहनरावजी आव्हाड साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन



परळी( प्रतिनिधी )परळी औष्णिक विद्युत केंद्राचे निवृत्त मुख्य अभियंता मा. श्री .मोहन रावजी आव्हाड साहेब यांच्या वार शुक्रवार दिनांक 12 जून 2026 रोजी वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मा. श्री. मोहनरावजी आव्हाड साहेब यांनी चंद्रपूर, नाशिक ,भुसावळ परळी ,उरण , येथे मुख्य अभियंता म्हणून आपला प्रशासकीय कार्यकाळ यांनी गाजवला तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त 12 जून 2026 रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यात प्रभू वैद्यनाथ अभिषेक , प्रभू वैद्यनाथ खिचडी वाटप तसेच श्री रत्नेश्वर वारकरी शिक्षण संस्था टोकवाडी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार . या पान 3 वर

# बीडच्या आरक्षण उपवर्गीकरण मोर्च्याला लाखोंच्या संखेने उपस्थित रहा

## सामाजिक कार्येकर्ते सुरज(भाऊ)लोखंडे




किल्लेधरूर प्रतिनिधी: बाबुराव तिडके अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण ही सामाजिक न्यायाची मागणी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेमध्ये आरक्षणाची तरतूद तळा गळातील मागासलेल्या गटकाला समान संधी देऊन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केली होती. मात्र त्याच आरक्षणाचा लाभ सर्व वंचित समूहापर्यंत जात नसल्याने आणुसुचीत जातीतील 59 जातींचे आरक्षण अ.ब.क.ड.उपवर्गीकरण करण्यासमंधीत मागणीसाठी 16 जुन 2026 रोजी बीड जिल्हाआधिकारी कार्यालयांवर आरक्षण उपवर्गीकरण लवकरात लवकर लागु करा या मागणी साठी मोर्च्याचे आयोजन केले आहे.या मोर्च्याला बीड जिल्हा आणि राज्यातील सर्व समूहातील समाजबांधवानी लाखोंच्या संखेने उपस्थित रहाण्याचे आवहान सामाजिक कार्येकर्ते युवा नेते सुरज(भाऊ) लोखंडे यांनी केले आहे. आमचा लढा सामाजिक हाक्कासाठी,चला लढुया पिढ्या घडवण्यासाठी. पान 3 वर

# युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीत चोरट्यांचा धुमाकूळ !



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे

तालुक्यातील युसुफ वडगाव पोलीस ठाणे हद्दीतील जलळबन येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडून दागिने, रोख रक्कम आणि दुचाकी असे एकूण 4 लाख 49 हजारांचा ऐवज लंपास केला. तसेच तीन ठिकाणी चोरीचा प्रयत्न फसला आहे. एकाच रात्री या घटना घडल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जवळबन (ता. केज) येथील शेतकरी महादेव धनराज करपे यांच्या घराचे गेट तोडून चोरटे घरात घुसले आतील कपाट तोडून 150 ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत 3 लाख 66 हजार रोख रक्कम 50 हजार तर शेजाऱ्याच्याची दुचाकी 25 हजार असा एकूण 4 लाख पान 3 वर

# केज तालुक्यातील 122 पैकी अनेक ग्रामपंचायत मध्ये, विहिरी,घरकुल भोगस चर्चा सत्र ?

## सीईओ रहमान साहेब केज तालुक्यात एवढा भ्रष्टाचार ?




केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे

केज तालुक्यात 122 ग्रामपंचायत आहेत त्यापैकी अनेक ग्रामपंचायत मध्ये विहिरी, घरकुल योजनेचा महाघोटाळा असल्याचे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरु आहे.परंतु एकही अधिकारी जिल्हा परिषद सिईओ यांच्या कडे लक्ष वेधून इच्छीत नाही जर आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या सारखी कामगिरी जिल्हा परिषद सीईओ यांनी बजावली तर अनेक ग्रामसेवक, सरपंच यांना घरी बसावे लागेल तरी सीईओ साहेब यांनी केज पंचायत समितीच्या मनरेगा, घरकुल विभागाकडे लक्ष वेधून आयुक्त तुकाराम मुंडे साहेब यांच्या सारखी कामगिरी करावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे कारण केज तालुक्यातील मनरेगा, घरकुल योजनेच्या माध्यमातून पान 3 वर

# आनंदगाव – सोनीजवळा -रस्ता दोन वर्षभरापासून उखडून ठेवला !



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे आनंदगाव सोनीजवळा रस्ता नवीन डांबरीकरण होणार मंजुरी आली असल्याचे सांगत गुत्तेदाराने आनंदगाव सोनीजवळा रस्ता गेल्या दोन वर्षभरापासून उखडून ठेवला आहे. यामुळे आतापर्यंत अनेक अपघात झाले आहेत. प्रसूतीसाठी घेऊन जाताना एका बाळाला जीव गमावा लागला आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या गाडीच्या बैलाला जीव गमवावा लागला आहे. रहदारीस अडथळा निर्माण होतो आहे. दुचाकी, चार चाकी बैलगाडी, पायी चालणे कठीण झाले आहे. आठ दिवसाचे आत काम सुरु न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग गुत्तेदारावर मेहरबान असल्याने वारंवार मागणी करूनही गुत्तेदार कोणाला जुमानत नाहीत बजेट नाही करता येईल पाणी नाही अशा प्रकारची उडवाउडवी चे उत्तरे देतात. रस्ता पूर्ववत करून द्या पूर्वीचा थोडा बरा असलेला रस्ता गुत्तेदाराने उकडून ठेवलेला आहे त्यावर ना दबई केली नाही. योग्य प्रकारची खडी मुरुम टाकण्यात आलेला नाही केवळ वरून थातूरमातूर उकरुन ठेवण्यात आलेला आहे. पान 3 वर

**रस्त्यावर अनेक अपघात,भामट्या गुत्तेदारांवर कारवाईची मागणी !**

# माजलगाव पंचायत समितीतील स्वच्छतागृहाची दुरावस्था; नागरिक-सेवक दोघेही त्रस्त

## पाण्याअभावी स्वच्छता नाही, कार्यालयात अनधिकृत व्यक्तींच्या उपस्थितीची तक्रार




माजलगाव | अनंत घडसिंगे माजलगाव पंचायत समिती कार्यालयातील स्वच्छतागृहाची दुरावस्था गंभीर बनली आहे. पाण्याची सुविधा नसल्याने स्वच्छता राहिली नसून दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे कार्यालयात येणारे नागरिक आणि कर्मचारी दोघांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

**• स्वच्छतेचा अभाव, मूलभूत सुविधा कोलमडल्या**

कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या म्हणण्यानुसार, स्वच्छतागृहात पाण्याचा पुरवठा नियमित नाही. त्यामुळे वापरानंतर साफसफाई होत नसल्याने सगळीकडे अस्वच्छता पसरली आहे. शौचालय, हात धुण्याची जागा येथे पाण्याअभावी अस्वच्छता दिसून येत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांसाठी ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे.

**• अनधिकृत व्यक्तींच्या वावराची तक्रार**

पान 3 वर

# धम्मसंस्कार शिबिराचा समारोप : धम्मरॅली आणि धम्मदेसनेने परिसर दुमदुमनार



माजलगाव | प्रतिनिधी येथील 'यशोधरा बुद्धविहार ट्रस्ट' आणि 'प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 10 दिवसीय धम्मसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ आज, शुक्रवार, दिनांक 12 जून 2026 रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या निमित्ताने धम्मरॅली, धम्मदेसना आणि धम्मभोजनदानाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराची व्याप्ती आणि विशेष आकर्षण गेल्या 10 दिवसांपासून सुरु असलेल्या या शिबिरात माजलगाव शहर आणि परिसरातील एकूण 110 विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला होता. या शिबिरात धम्मसंस्कार, पाली भाषा, बुद्ध जीवनी आणि महापुरुषांच्या जीवनचरित्राचे धडे देण्यात आले. उद्या होणाऱ्या समारोप सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे सकाळी आयोजित केलेली धम्मरॅली, जी यशोधरा पान 3 वर